


# कृष्णा एक्सप्रेस



संपादक - गोरख काशिनाथ तावरे

✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक २४४ वा. ✻ मंगळवार दि.०७ एप्रिल २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 244 ✻ Tuesday 07 April 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## जनकल्याण पतसंस्था, कराडची उज्वल भविष्याकडे दमदार वाटचाल-चंद्रशेखर देशपांडे

कराड : संस्थेने सन २०२५-२६ या संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या व्यवसायाचा चढता आलेख कायम ठेवण्यात यश मिळविले आहे. आपल्या व्यावसायिक वाटचालीत सातत्य कायम ठेवत असताना दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर. एकुण व्यवसाय रु.९६० कोटींपेक्षा जास्त झाला आहे.

मार्च २६ अखेर रक्कम रु.५९५ कोटींच्या पेक्षा जास्त ठेवी संस्थेकडे जमा झाल्या असून रुपये ३६४ कोटी इतके कर्ज वितरण केले आहे. संस्थेने विविध बँकामधून रु.३१७ कोटीची सुरक्षित गुंतवणूक केलेली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर देशपांडे यांनी दिली. व्यावसायिक तीव्र स्पर्धे तही बाजारपेठेतील सकारात्मक हालचालींचा संस्थेच्या कामकाजात नियोजनबध्द उपयोग करुन, तसेच प्रभावी कर्ज वसूली च्या जोरावर संस्थेने नक्त एन.पी.ए चे १.८५ टक्के इतके प्रमाण राखले आहे. तर संस्थेस संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेस रु.७.कोटींपेक्षा जास्त नक्त नफा झाला आहे.

संस्थेने सभासदांसाठी अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित विविध सेवा सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. यामध्ये युटिलिटी पेमेंटस्, फास्टॅग, क्यू.आर.कोड, टॅक्स पेमेंट कलेक्शन याचबरोबर आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी, प्रीपेड डेबीट कार्डचा समावेश होतो. या सुविधांचा संस्थेच्या सभासदांना मोठ्या प्रमाणावर लाभ होत आहे. संस्थेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग सुविधा तर दिली आहेच त्याच बरोबर नजीकच्या एक ते दोन महिन्यात आपण णझख पेमेंट सुविधा ग्राहकांच्या सेवेस रुजू करीत आहोत असेही अध्यक्ष म्हणाले.

विमा व्यवसायामधील संस्थांबरोबर व्यावसायिक करार करुन जनरल इन्शुरन्स अंतर्गत वाहन, फायर, मरीन, इंडस्ट्रीअल व हेल्थ इन्शुरन्स व लाईफ इन्शुरन्स अंतर्गत टर्म इन्शुरन्सचा संस्था व्यवसाय करत आहे. या व्यवसायांतर्गत असलेल्या योजनांचा संस्थेच्या अनेक सभासदांनी लाभ घेतलेला आहे व समाधान देखील व्यक्त केले आहे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अभिजीत चाफेकर म्हणाले कि संस्थेने नियमित कर्ज



परतफेड करणा-या कर्जदारांना सलग १५ वर्षे प्रोत्साहनपर व्याजदरात १ टक्क्यापर्यंत याप्रमाणे आज अखेर एकूण रु.८.३२ कोटी इतका रिबेट दिलेला आहे. त्याचा नियमित कर्जदारांना निश्चितच लाभ झालेला आहे. सन २०२५-२६ या संपलेल्या आर्थिक वर्षात नियमित कर्ज भरणा-या कर्जदारांच्या रिबेटची रक्कम लवकरच त्यांच्या सेव्हिंग्ज/चालू खाती जमा होईल. रिबेट देण्याचे संचालक मंडळाचे हे धोरण पुढे ही सातत्याने ठेवले जाईल. २०२६-२७ यावर्षी देखील आपली कर्ज खाती नियमित ठेवून रिबेट योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन देखील त्यांनी कर्जदारांना केले.

आर्थिक वर्ष २०२६-२७ हे अजूनही आव्हानात्मक असणार आहे याची संस्थेच्या संचालक मंडळास जाणीव असून या आव्हानांचा सक्षमपणे सामना करणेस जनकल्याण पतसंस्था सिध्द असल्याचे अध्यक्ष श्री.चंद्रशेखर देशपांडे यांनी सांगीतले. मागील वर्षामध्ये संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेतल्याबद्दल व संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्व सभासदांचे अध्यक्षांनी आभार मानले. तसेच या आर्थिक वर्षामध्ये १. बारामती, जि. पुणे, २. कोथरुड, जि. पुणे, ३. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर व ४. तासगाव. जि. सांगली या ४ शहरांमध्ये शाखा सुरु करण्याचे नियोजीत असल्याचे सांगितले.

यावेळी संस्थेचे संचालक डॉ.प्रकाश सप्रे, डॉ.अविनाश गरगटे, सीए शिरीष गोडबोले, श्री.एकनाथ फिरंगे, श्री.जितेंद्र शहा, श्री.हिंदुराव डुबल, श्री.मोहन सर्वगोड, डॉ.सुचिता हुद्देदार, सौ.वर्षा कुलकर्णी, सौ.पुनम वास्के, श्री दिपक जोशी, श्री प्रविण देशपांडे, श्री सुनील कुलकर्णी, सीए. आशुतोष गोडबोले, श्री. अशोक आटकर व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनायक फडके हे उपस्थित होते.

## कराडनगरीची ग्रामदैवता कृष्णामाईची यात्रा उत्साहात; प्रथेप्रमाणे आज नगरप्रदक्षिणा

कराड : कराडनगरीची ग्रामदैवता श्री कृष्णामाईची चैत्री यात्रा आज सोमवारी उत्साहात संपन्न झाली. विद्युत रोषणाई, फुलांनी मुख्य मंदिर व परिसरातील मंदिरेही सजवण्यात आली होती. तर सुवर्णालंकार अन् भरजरी साडीतील कृष्णामाईचे देखणे रूप डोळ्यात साठवत भक्तगण नतमस्तक होत होते.



कृष्णामाई यात्रा महोत्सवात रितीरिवाजाप्रमाणे पूजाअर्चा, विधी व धार्मिक तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रम संपन्न झाले. यात्रेनिमित्त कराड शहरासह ठिकठिकाणांहून आलेल्या भाविकांनी अवघा कृष्णाघाट परिसर बहरला होता. कृष्णामाईचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच लोकांच्या रांगा लागल्या होत्या. सालाबादप्रमाणे कृष्णामाईला पुरणपोळ्यांचा नेवैद्य दाखवत सुहासिनींकडून खणा- नारळाने देवीची ओटी भरण्यात येत होती. दरम्यान, प्रसाद, मिठाईसह खेळणी विक्रीची दालने, खाद्य पदार्थांचे हातगाडे लोकांच्या गर्दीने फुलून गेले होते.

हनुमान जयंतीच्या शुभमुहूर्तावर 'श्रीं'ची सवाद्य पालखी मिरवणूक निघाली आणि सालाबादप्रमाणे मंडपात 'श्रीं'ची विधिवत प्रतिष्ठापना होऊन कृष्णामाई यात्रा महोत्सवाचा शुभारंभ झाला होता. यानंतर दुसऱ्या दिवशी 'नवचंडी याग' संपन्न झाला. राजेंद्र कुलकर्णी आणि सहकाऱ्यांचा 'गीतरामायण' हा श्रवणीय कार्यक्रम संपन्न झाला. तर भजन, हळदी कुंकू' पूजाअर्चा आणि 'मन करा रे प्रसन्न' व 'जुन्या हिंदी चित्रपटातील गाण्यांचा कार्यक्रम' पार पडला आहे. तसेच दररोज महाप्रसादही वाटप करण्यात आला.

आज नगरप्रदक्षिणा कृष्णामाई यात्रेच्या मुख्य दिवसानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. ७) सकाळी ढोल ताशांच्या गजरात देवीची पालखीतून नगरप्रदक्षिणा होणार आहे. या मिरवणुकीला सुध्दा विशेष महत्व असून, मानकरी नागरिक, व्यापारी जागोजागी पालखीचे फटक्याच्या आतषबाजीत स्वागत करून, कृष्णामाईच्या पूजेच्या मूर्तीचे दर्शन घेत असतात. ही मिरवणूक मंडपात येवून विसावल्यानंतर सायंकाळी उशिरा लळीत कीर्तन, वसंतपूजा व रात्री येसूबाईच्या यात्रेने कृष्णामाई यात्रा महोत्सवाची परंपरेनुसार सांगता होणार आहे.

## कोरेगाव गॅस एजन्सी प्रकरणात १.२५ लाखांची लाच घेताना खाजगी व्यक्ती जेरबंद;शासकीय अधिकाऱ्यावरही गुन्हा

कोरेगाव : कोरेगाव येथील भारत गॅस एजन्सीच्या गोडावूनची वारंवार तपासणी न करण्यासाठी तसेच तक्रारींवर कारवाई टाळण्यासाठी लाच मागणी करणाऱ्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा पथकाने सापळा रचून १ लाख २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना खाजगी इसमाला रंगेहाथ पकडले आहे. या प्रकरणात संबंधित शासकीय अधिकाऱ्यावरही कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.तक्रारदार यांची कोरेगाव येथे भारत गॅस एजन्सी असून, सध्याच्या परिस्थितीत ते नियमानुसार गॅस सिलेंडरचे वितरण करीत होते. मात्र तहसील कार्यालय, कोरेगाव येथील पुरवठा निरीक्षण अधिकारी आनंद कैलास शिंदे यांनी गोडावूनची वारंवार तपासणी न करण्यासाठी तसेच एजन्सीविरुद्ध आलेल्या तक्रारींवर कारवाई न करण्यासाठी २ लाख रुपयांची लाच मागणी केली होती. यापैकी तक्रारदार यांनी ३१ मार्च रोजी २५ हजार रुपये दिले होते. उर्वरित रकमेबाबत सतत मागणी सुरू असल्याने त्यांनी १ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने १ एप्रिल रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली असता संबंधित अधिकाऱ्याने तडजोडीनंतर १ लाख २५ हजार रुपये लाच मागणी केल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले. त्यानंतर ६ एप्रिल रोजी सापळा कारवाई राबविण्यात आली.

सदर कारवाईदरम्यान संबंधित अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून अवधुत दिलीप कालेकर या खाजगी इसमाने जनसेवा सहकारी बँक, कोरेगाव शाखा आवारात पंचासमक्ष १ लाख २५ हजार रुपये लाच रक्कम स्वीकारली. त्यावेळी पथकाने त्याला रंगेहाथ पकडले.या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध कोरेगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कारवाई पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या पथकाने पार पाडली असून, तपास पोलीस निरीक्षक सुप्रिया गावडे करीत आहेत.

## राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा

### एलपीजी पुरवठा सुरळीत; शासनाची व्यापक उपाययोजना





**नियंत्रण कक्ष आणि तक्रार निवारण यंत्रणा कार्यरत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माध्यमातूनच माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.**

मुंबई : राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा उपलब्ध असून एलपीजी, पेट्रोल व डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली. मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव असला तरी राज्यात टंचाईची स्थिती नसल्याचे स्पष्ट केले.राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात सुमारे ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी 'डीम्ड परवानगी' देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या भागात पाईपलाईन शक्य आहे, तिथे पीएनजीचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत असून संबंधित भागांमध्ये ग्राहकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. राज्यात सुमारे २४ तेल डेपोमार्फत ८,१०० पेट्रोल पंपांना सेवा दिली जात असून दररोज मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेलचे वितरण केले जाते. मागील काही दिवसांतील विक्रीही सरासरीप्रमाणेच असल्याने इंधनटंचाई नाही, असेही स्पष्ट करण्यात आले. एलपीजी पुरवठ्याबाबत माहिती देताना शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे यांनी सांगितले की, राज्यात २३ बॉटलिंग प्लांट्सद्वारे सुमारे ३.५ कोटी ग्राहकांना सेवा दिली जात आहे. दररोज सरासरी ५.८२ लाख रिफिल वितरित होत असून ९५ टक्के बुकिंग डिजिटल माध्यमातून केले जात आहे.

वितरण पारदर्शक करण्यासाठी डीएसी प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. दरम्यान, काळाबाजार रोखण्यासाठी १४ हजारांहून अधिक तपासण्या करून हजारो सिलिंडर जप्त करण्यात आले असून अनेकांवर कारवाई करण्यात आली आहे.

## कोयना बँकेची दमदार वाटचाल; २०० कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण

### स्थापनेपासून ऑडिटमध्ये 'अ' वर्ग कायम राखत विश्वासार्हता जपली







कराड : लोकनेते स्व. विलासकाका पाटील (उंडाळकर) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थापक ड. उदयसिंह पाटील (उंडाळकर) यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोयना सहकारी बँक लि., कराड ने मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात नेत्रदीपक कामगिरीची नोंद केली आहे. बँकेने २०१.३५ कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा यशस्वीपणे पार करून आपली दमदार वाटचाल सिद्ध केली असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष कृष्णत पाटील यांनी दिली. सन १९९६ साली कराड येथे स्थापन झालेल्या या बँकेने सातारा, सांगली आणि पुणे या तीन जिल्ह्यांत आपले जाळे विस्तारले आहे. आज बँकेच्या एकूण १२ शाखा कार्यरत असून, मुख्य कार्यालय स्वमालकीच्या सुसज्ज इमारतीत आहे. स्थापनेपासून बँक सातत्याने नफ्यात असून, दरवर्षी बँकेला 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त होत आहे, हे बँकेच्या पारदर्शक कारभाराचे प्रतीक आहे.

मार्च २०२६ अखेर बँकेच्या एकूण ठेवी २०१.३५ कोटी रुपयांवर पोहोचल्या असून, बँकेने १४१.१० कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे. बँकेचा सीडी रेशो ७०.०७% इतका समाधानकारक आहे. अत्यंत शिस्तबद्ध कारभारामुळे बँकेने १.९५ कोटी रुपयांचा ढोबळ नफा आणि ०.९२ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. तसेच, बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १५.१२% असून निव्वळ एनपीए (Net NPA) २.७७% इतका मर्यादित राखण्यात बँकेला यश आले आहे.

ग्राहकांना जलद सेवा देण्यासाठी बँकेने IMPS (मोबाईल बँकिंग) आणि णझख यांसारख्या आधुनिक सुविधांचा यशस्वी अवलंब केला आहे. आरबीआयच्या सर्व निकषांची पूर्तता करत असतानाच, संचालक मंडळाने निस्वार्थपणे आणि विश्वस्ताच्या भूमिकेतून काम केल्यानेच ही प्रगती साध्य झाल्याचे उपाध्यक्ष साहेबराव शेवाळे यांनी नमूद केले. बँकेच्या या यशाबद्दल बोलताना अध्यक्ष कृष्णत पाटील म्हणाले की, स्व. विलासकाकांच्या विचारांचा वारसा आणि ॲड. उदयसिंह पाटील यांचे मार्गदर्शन यामुळेच बँक प्रगतीपथावर आहे. बँक नेहमीच तत्पर सेवा देण्यास कटिबद्ध असून, जास्तीत जास्त सभासद आणि खातेदारांनी बँकेच्या आकर्षक ठेव व कर्ज योजनांचा लाभ घ्यावा.

## कर्तृत्ववान महिलांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक-ना.शिवेंद्रसिंहराजे

सातारा-आज प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. चूल- मूल, संसार याबरोबरच स्त्री नोकरी, व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत आहे. ही अभिमानाची बाब असून प्रत्येक महिलेने सक्षम झाले पाहिजे. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचे समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान असून अशा महिलांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.




शेंद्रे ता. सातारा येथील स्व. अभयसिंहराजे भोसले सांस्कृतिक भवन येथे ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या वतीने सातारा तालुक्यातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, होम मिनिस्टर हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा असा संयुक्त कार्यक्रम उत्साहात झाला.

हजारो महिलांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देताना ना. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी आ. मनोज घोरपडे, सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजू भोसले, सदस्य अजित साळुंखे, सर्जे राव सावंत, पूजा मोरे, सातारा पंचायत समितीचे सभापती महेश गाडे, उप सभापती सुषमा जाधव, सदस्य कोमल दळवी, प्रमिला सुतार,

**महिला सन्मान सोहळा, आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात**

विजया साळुंखे, मानसिंग मोरे, प्रभाकर पवार, सातारा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रम पवार, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन नामदेव सावंत, डॉ. दीपक थोरात, सातारा मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. विनायक काळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, दंतरोग, त्वचारोग, नेत्र तपासणी, असंसर्गजन्य रोग तपासणी यासह विविध आजाराच्या तपासण्या करण्यात आल्या. याशिबिराचा लाभ सुमारे १५०० महिलांनी घेतला. याप्रसंगी अनेक महिलांनी रक्तदान केले. शिबिरात डॉ. स्नेहांजली महामुनी, डॉ. आशा बर्गे, डॉ. दीप्ती पवार, डॉ. अश्विनी सोनवलकर, डॉ. वैशाली चव्हाण, डॉ. रसिका गोखले, डॉ. राजश्री ठोके, डॉ. अपर्णा जगताप आदी तज्ञांनी विविध आजार, उपचार याबाबत महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. आरोग्य शिबीर व महिला सन्मान सोहळ्याला हजारो महिला उपस्थित होत्या.

या महिलांच्या मनोरंजनासाठी अभिनेते ओम यादव यांचा 'होम मिनिस्टर' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाने उपस्थित महिलांची मने जिंकली. या कार्यक्रमतील विजेत्या तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माता- भगिनींचा ना. शिवेंद्रसिंहराजे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## संपादकीय....

# सहकारातील पारदर्शकता

मार्च महिना संपल्यानंतर आर्थिक संस्थांचे ताळेबंद जाहीर होण्याची प्रक्रिया सुरू होते. या निमित्ताने बँका व पतसंस्था आपला नफा-तोटा, आर्थिक स्थिती आणि कामगिरीचा लेखाजोखा सादर करतात. महाराष्ट्रासारख्या सहकारप्रधान राज्यात सहकारी बँका व पतसंस्थांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेत त्यांचे महत्त्व लक्षणीय आहे. सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक गरजा पूर्ण करणे, बचतीला चालना देणे आणि कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून विकासाला गती देणे, हे सहकाराचे मूलभूत उद्दिष्ट आहे.सहकार चळवळीचा पाया घालताना यशवंतराव चव्हाण यांनी सामान्य जनतेच्या आर्थिक उन्नतीचा विचार केंद्रस्थानी ठेवला होता. सहकाराच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत आर्थिक सेवा पोहोचविणे आणि लोकांचे जीवनमान उंचावणे, हा त्यामागील मुख्य हेतू होता. आजही अनेक सहकारी बँका आणि पतसंस्था प्रामाणिकपणे कार्य करत असून त्या सभासदांच्या हितासाठी कार्यरत आहेत.

मात्र, या सकारात्मक चित्रासोबत काही चिंताजनक वास्तवही समोर येत आहे. काही बँका व पतसंस्था केवळ नफेखोरीच्या उद्देशाने स्थापन झाल्याचे दिसून येते. अशा संस्थांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, गैरव्यवस्थापन आणि आर्थिक गैरप्रकार यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. परिणामी, ठेवीदारांचा विश्वास कमी होतो आणि सहकार व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात येते.अलीकडील काळात स्वार्थ, गटबाजी आणि वैयक्तिक फायद्यासाठी संस्थांचा वापर करण्याचे प्रकार वाढले आहेत. काही ठिकाणी नियमांचा गैरफायदा घेऊन संस्थांना आर्थिक अडचणीत आणले जाते आणि शेवटी त्या संस्थांचा डबघाईकडे प्रवास होतो. अशा घटनांमुळे सहकार चळवळीच्या मूळ मूल्यांनाच तडा जात आहे. या पार्श्वभूमीवर नियामक यंत्रणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि शासनाच्या नियंत्रणाखाली सहकारी बँका व पतसंस्था कार्यरत असल्या तरी प्रत्यक्षात देखरेख व अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्याची गरज आहे. नियमित लेखापरीक्षण, कठोर कारवाई आणि नियमांची काटेकोर अंमलबजावणी यामुळे गैरप्रकारांवर आळा बसू शकतो. सहकार चळवळ टिकवण्यासाठी पारदर्शकता, जबाबदारी आणि नैतिकता या मूल्यांचे पालन होणे अत्यावश्यक आहे. संचालक मंडळांची निवड गुणवत्तेच्या आधारावर होणे, ठेवीदारांच्या हिताला प्राधान्य देणे आणि गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, या गोष्टी काळाची गरज बनल्या आहेत.एकूणच, सहकार ही समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी निर्माण झालेली महत्त्वपूर्ण व्यवस्था आहे. मात्र तिचा गैरवापर होत असल्यास ती विश्वासघाताच्या संकटात सापडते. त्यामुळे सहकारातील सर्व घटकांनी जबाबदारीने व पारदर्शकतेने कार्य करून या व्यवस्थेचा आत्मा जपणे आवश्यक आहे.

# साधना सप्ताहातून प्रशासन होई कर्मयोगी

केंद्र शासनाच्या क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने देशभरात दिनांक २ एप्रिलपासून साधना सप्ताह सुरू आहे. Strengthning Adaptive Development and Human Aptitude for National Advancement च्या आद्याक्षरांतून SADHANA हा शब्द तयार झाला आहे. साधना सप्ताहामध्ये २ एप्रिलपासून देशभरात आतापर्यंत ८० लाखहून अधिक कोर्सेसअंतर्गत १ कोटीपेक्षा अधिक तासाचे प्रशिक्षण अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतले आहे. राज्यातही साधना सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम आणि भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे हा साधना सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमात मंत्रालयीन विभागांपासून जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व शासकीय कार्यालयांचा समावेश आहे. राज्यातील सर्व जिल्हे, ३२ विभाग आणि ६ विभागीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी या सप्ताहात सहभागी होणार असून, प्रशासनाच्या सर्व स्तरांवर हा उपक्रम राबविला जात आहे. 'मिशन कर्मयोगी'चा भाग असलेला हा कार्यक्रम पूर्णपणे ऑनलाइन स्वरूपात आहे.शासकीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवणे, त्यांच्या ज्ञानात अद्ययावतता आणणे आणि प्रशासन अधिक परिणामकारक बनवणे, बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा वापर, नव्या धोरणांची समज आणि लोकाभिमुख सेवा देण्याची क्षमता विकसित करणे यावर या उपक्रमात विशेष भर दिला गेला आहे.या सप्ताहादरम्यान सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी iGOT (Integrated Government Online Training) कर्मयोगी पोर्टलवरील विविध प्रशिक्षण कोर्स पूर्ण करणे अपेक्षित आहे. प्रशिक्षणासाठी एकूण ५० कोर्स उपलब्ध करून देण्यात आले असून, बिगिनर, इंटरमिडीएट आणि आयगॉट मार्केटप्लस कोर्सेस अशा तीन स्तरावर हे कोर्स मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. बिगिनर लेव्हलसाठी २४ कोर्सेस, इंटरमिडीएट लेव्हलसाठी १३ कोर्सेस आणि आयगॉट मार्केटप्लस लेव्हलसाठी १३ कोर्सेस प्रोव्हाईड केले आहेत. यातील आयगॉट मार्केटप्लस लेव्हलमधील कोर्सेस परदेशातील विद्यापीठातील आहेत. तर अनेक कोर्सेस आय आय टी ने तसेच गूगल, मायक्रोसॉफ्टने प्रोव्हाईड केले आहेत.

प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने किमान ४ तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. हे कोर्स प्रशासनातील विविध अंगांवर आधारित असून, त्यातून दैनंदिन कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होतात. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सिक्युरिटी, सुशासन, नेतृत्त्वगुण, प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आदिंच्या अनुषंगाने या कोर्से समध्ये माहिती दिली जात असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर फायनल असेसमेंटही करून ऑनलाईन प्रमाणपत्र दिले जाते.साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे) विभागांना मे २०२६ मध्ये होणाऱ्या TECH-वारी २.० या कार्यक्रमात प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये स्पर्धात्मकता वाढून अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळणार आहे. साधना सप्ताहामुळे शासकीय यंत्रणेत एक सकारात्मक बदल घडून येण्याची अपेक्षा आहे. नियमित प्रशिक्षणामुळे कर्मचारी अधिक कुशल बनतात, निर्णयप्रक्रिया जलद होते आणि नागरिकांना सेवा देण्याची गुणवत्ता सुधारते. तसेच, डिजिटल माध्यमांचा वापर वाढल्यामुळे कामकाज पारदर्शक आणि सोयीस्कर बनते. साधना सप्ताह हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून, तो प्रशासनाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. शासनाच्या या उपक्रमामुळे अधिकारी व कर्मचारी अधिक सक्षम, जबाबदार आणि लोकाभिमुख होऊन भविष्यातील विविध तंत्रज्ञानात्मक आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी सज्ज होतील.

**संकलन - संप्रदा बीडकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

# कोणत्याही प्रकारच्या आजारावर मात करण्यासाठी आध्यात्मिक उपाय आवश्यक!

**शॉर्न क्लार्क यांचे 'गोमंतक आयुर्वेद महाविद्यालया'त प्रतिपादन**

शिरोडा, (गोवा) - कोणत्याही प्रकारच्या आजारावर मात करण्यासाठी शारीरिक उपचारांसोबतच आध्यात्मिक उपाय करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाचे संशोधक श्री. शॉर्न क्लार्क आणि सौ. श्वेता क्लार्क यांनी केले. शिरोडा येथील 'गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय' व संशोधन केंद्रात 'उपचारांमध्ये अध्यात्माची भूमिका' या विषयावर आयोजित अतिथी व्याख्यानात दोघे बोलत होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलेश कोरडे आणि गोवा कौन्सिल ऑफ आयुर्वेदिकच्या अध्यक्षा डॉ. स्नेहा भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीसह सुमारे १०० पदव्युत्तर विद्यार्थी अन् आयुर्वेद विषयातील प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. याप्रसंगी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या संशोधन पथकाने आधुनिक ऑरा आणि ऊर्जा स्कॅनर्सच्या माध्यमांतून सिद्ध केलेले निष्कर्ष उपस्थितांसमोर मांडले.

संशोधन पथकाने सांगितले की, गेल्या २५-३० वर्षांत वैद्यकशास्त्रात अध्यात्माची गरज वाढत चालली आहे. त्यामुळे वर्ष १९९० च्या सुरुवातीस अमेरिकेतील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अध्यात्म-आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आणि एका सर्वेक्षणानुसार आज ते सुमारे ९०% महाविद्यालयांमध्ये समाविष्ट झाले आहेत. तथापि, प्राचीन भारतीय आयुर्वेदशास्त्रानुसार, कर्म (प्रारब्ध) हे रोगांचे एक मुख्य मूळ कारण मानले गेले आहे, तसेच वात, पित्त आणि कफ यांचे असंतुलनही कारणीभूत असते. आपल्या प्राचीन शास्त्रांमध्ये सत्त्व गुण वाढवणे आणि रज-तम गुण कमी करणे हे सुखी व निरोगी जीवनासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले आहे.

संशोधन पथकाने पुढे सांगितले की, त्यांनी आधुनिक ऑरा आणि ऊर्जा स्कॅनर्स, तसेच संशोधन पथकातील सदस्यांच्या प्रगत सहावे इंद्रियाच्या साहाय्याने अनेक संशोधन केले. त्यांच्या निष्कर्षानुसार जीवनातील ५०% पेक्षा जास्त समस्या या पूर्णपणे आध्यात्मिक स्वरूपाच्या असतात. प्रारब्ध हे त्यामागील मुख्य कारण असून,




गंभीर आजारही कर्मानुसार ठरलेले असतात. नकारात्मक ऊर्जा वैद्यकीय समस्यांना उद्भवू शकते, ती वाढवू शकते किंवा योग्य निदानालाही अडथळा आणू शकते. अशा वेळी अनुभवी आयुर्वेद वैद्य 'भूत नाडी' ओळखून नकारात्मक ऊर्जा सक्रिय आहे का, हे समजू शकतात आणि आध्यात्मिक उपायांद्वारे त्यावर मात करण्यात साहाय्य करू शकतात.कोणत्याही वैद्यकीय समस्येमागील तिसरा आध्यात्मिक घटक म्हणजे आपल्या पितरांचा त्रास असू शकतो. एक्झिमा, अपत्यप्राप्तीमध्ये अडचणी किंवा गर्भपात, तसेच व्यसनाधीनता यांसारख्या समस्या केवळ पारंपरिक औषधांनी पूर्णपणे बऱ्या होऊ शकत नाहीत. आत्मउपाचार साधने, नियमित साधना आणि सात्त्विक जीवनशैली यांसारखे आध्यात्मिक उपाय सत्त्व गुण वाढवण्यासाठी आणि सर्वांगीण आरोग्य प्राप्त करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.संशोधनच्या निष्कर्षाविषयी त्यांनी सांगितले की, आपल्या धर्मानुसार देवाचे नामस्मरण करणे, १५ मिनिटांचे मिठाच्या पाण्याचे उपाय, स्वभावदोषांवर मात करणे आणि ताजे शिजवलेले शाकाहारी सात्त्विक अन्न सेवन करणे हे सर्व आध्यात्मिक समस्यांवर (वैद्यकीय समस्यांसह) प्रभावी आत्मउपचार साधने ठरू शकतात.

# मानसिंगभाऊ लोककल्याण अभियान व वन विभाग शिराळा मार्फत शिवम शौर्य : सुरक्षा अभियान

## शिराळा : महाराष्ट्रातील एक अभिनव जनजागृती उपक्रमाची मांगले येथून सुरुवात : जि.प.सदस्य विराज नाईक यांची माहिती

शिराळा तालुक्यात वाढते हिंस्र प्राण्यांचे हल्ले व त्यातून माणसे, पाळीव प्राणी, पशुधन, शाळकरी मुले यांच्यावरील हल्ले वाढत आहेत. या गंभीर प्रश्नांचा विचार करून शाळकरी मुलांमध्ये जनजागृती होण्यासाठी दृष्टीने वन विभाग, शिराळा व मानसिंगभाऊ लोककल्याण अभियान मार्फत शिवम शौर्य : सुरक्षा अभियान सुरू करत आहोत. ही माहिती जिल्हा परिषद विराज नाईक यांनी चिखली येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.



ते म्हणाले, शिराळा तालुका हा डोंगराळ व शासनाच्या निकषात अतिमागास म्हणून मोडतो. येथे असलेले आशिया खंडातील क्रमांक दोनचे मातीचे चांदोली धरण व चांदोली राष्ट्रीय उद्यान तालुक्यास देशपातळीवर ओळख देते. चांदोलीचा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातही समावेश आहे. अर्थात वाघ, बिबटे यासारख्या हिंस्र प्राण्यांसह इतर विविध जातीचे प्राणी, पक्षी उद्यानात आढळतात. अलीकडील काळात तालुक्यातील नागरिकांपुढे एक वेगळाच प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यात बिबटे, गवे, रानडुक्कर सारख्या हिंस्र प्राण्यांकडून शाळकरी मुलांवर, माणसांवर, पाळीव प्राण्यांवर व पशुधनावर सातत्याने हल्ले होत आहेत. जणू काय बिबट्याचा अधिवास हा ऊस शेती व मानवी वस्तीलगतच्या शेत शिवारात झाला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस हल्ल्यात वाढ होत आहे. काही शाळकरी मुले, माणसे, पाळीवर प्राणी व पशुधनांना जीव गमवावा लागला आहे. श्री. नाईक म्हणाले, या अभियानाच्या उद्देशाची चाचपणी करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर तालुक्यातील सागाव येथील समाज विकास विद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. त्यास मिळालेला प्रतिसाद व मुलांमध्ये झालेली जागरूकता, त्याबाबत आलेल्या प्रतिक्रियेतून हे अभियान सर्व शाळांत राबविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

तालुक्यात आतापर्यंत झालेले शेती अथवा मानवावरील हल्ल्यातून होणारे नुकसान हे बिबटे, गवे, रानडुक्कर यांच्याकडून झाले आहे. त्यामुळे शाळेला जाणारी मुले, शेतात काम करणारे शेतकरी, रात्रीचा मोटरसायकलने प्रवास करणाऱ्या मंडळींना जिवाचा धोका निर्माण झाला आहे.

ते म्हणाले, या गंभीर बनत चाललेल्या प्रश्नाबाबत वन विभागाच्या सहकार्याने शाळकरी मुलांवर होणाऱ्या हल्ल्याबाबत जागृती करण्यासाठी हे अभियान सुरू करत आहे. हिंस्र पाण्यांपासून शाळकरी मुला, मुलींनी आपला व अनुषंगाने आपल्या कुटुंबीयांचे संरक्षण कसे करावे, याची माहिती देणारे अभियान असेल. हे अभियान महाराष्ट्रातील पथदर्शी प्रकल्प ठरेल. त्यास विद्यार्थी व तालुक्यातील नागरिकांचे सहकार्य उपेक्षीत आहे.

**अभियानाच्या नावाची प्रेरणा तालुक्यातील घटनेतून : उपवळे (ता. शिराळा) येथे ७ जानेवारी रोजी बिबट्याने ११ वर्षाच्या शाळकरी मुलगा शिवम संग्राम पाटील व त्याची बहीण ९ वर्षाची बहीण स्वरांजलीवर बिबट्याने हल्ला केला होता. या हल्ल्यातून बहीण स्वरांजलीस शिवमने सुरक्षित वाचवले होते. शिवमने दाखवलेले हे धाडस शौर्य म्हणावे लागेल. ही प्रेरणा घेऊन आम्ही या अभियानाला शिवम शौर्य : सुरक्षा अभियान असे नाव दिले आहे.**

**अभियानचा उद्देश : अभियानार्तगत तालुक्यातील शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये हिंस्र वन्य प्राण्यापासून होणाऱ्या हल्ल्याविषयी जागृती व्हावी, हा मूळ उद्देश आहे. त्यामध्ये वन विभागामार्फत मार्गदर्शन, चित्रफीत व हल्ल्यातून स्व संरक्षण कसे करावे, हे दाखवण्यात व सांगण्यात येईल. विद्यार्थ्यांना दिली जाणारी माहिती ते आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचवतील व त्यामुळे सर्व कुटुंब हिंस्र प्राण्यापासून स्वसंरक्षणाची काळजी घेईल.**

# बारामती पोटनिवडणुकीत मतदारांसाठी 'ईसीआयनेट'ची सोय; उमेदवारांची सविस्तर माहिती एका क्लिकवर

पुणे : बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना उमेदवारांविषयी सविस्तर व पारदर्शक माहिती सहज उपलब्ध करून देण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'ईसीआयनेट' या एकात्मिक डिजिटल व्यासपीठाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून मतदारांना उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता व दायित्वे, शैक्षणिक पात्रता तसेच अधिकृत सामाजिक माध्यमांवरील खात्यांची माहिती 'आपला उमेदवार जाणून घ्या' या घटकाद्वारे पाहता येणार आहे.

मतदारांना ईसीआयनेटमधील निवडणूक प्रक्रिया या विभागांतर्गत हा घटक सहज उपलब्ध असून, त्याद्वारे उमेदवारांनी सादर केलेले संपूर्ण प्रतिज्ञापत्र (फॉर्म २६) देखील उतरवता येणार आहे. यामुळे मतदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होणार आहे. ईसीआयनेट हे जगातील सर्वात मोठे निवडणूक सेवा व्यासपीठ असून, भारतातील निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ४० हून अधिक ॲप्स व संकेतस्थळे एकत्रित करून एकसंध डिजिटल अनुभव देण्यात आला आहे.

या व्यासपीठाद्वारे मतदार नोंदणी, मतदार यादी शोध, अर्जाची स्थिती पाहणे, निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद, ई-मतदार ओळखपत्र डाउनलोड, मतदानाचे प्रवाह तसेच तक्रार निवारण यांसारख्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत.

याशिवाय, ईसीआयनेटवर 'सी-सिव्हिजल' या ॲपद्वारे आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नोंदविता येतात, तर 'सक्षम' उपक्रमाद्वारे दिव्यांग मतदारांसाठी सुलभ सेवा पुरविण्यात येत आहेत. या सर्व सुविधा एकाच सुरक्षित व्यासपीठावर उपलब्ध असल्याने मतदारांना तत्काळ माहिती व तक्रार निवारणाची प्रभावी सोय मिळत आहे. बारामती पोटनिवडणुकीत पारदर्शक, सुजाण आणि सक्रियमतदानासाठी मतदारांनी ईसीआयनेटचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

# आदिवासी क्षेत्र व समुदायाचा विस्तृत विकासावर भर द्या-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे : जिल्हाधिकारी यांनी मत्स्यव्यवसाय वृद्धिंगत करण्याकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या सहयोजनेतर्गत पुणे जिल्ह्यातील सन २०२५-२६ करिता प्राप्त परिपूर्ण प्रस्तावांस पुढील कार्यवाहीस्तव मंजुरी प्रदान केली आहे.

या बैठकीस सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय पुणे, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव कार्यालयाचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय घटक वृद्धिंगत करण्याकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही सह-योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-११२५/प्र. क्र.७१/पदुम १४ दिनांक ४/९/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुषंगाने पुणे जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ९९ गावांतील आदिवासी क्षेत्रातील इच्छुक लाभार्थींकडून प्रस्ताव मागणीस्तव जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुषंगाने सदर प्राप्त प्रस्तावांची छाननी करून परिपूर्ण असलेले प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी तथा प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना जिल्हास्तरीय मंजुरी व सनियंत्रण समिती पुढे मंजुरीस्तव मांडण्यात आले होते.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही सहयोजना राबविण्यात येत असून या योजनेमध्ये जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ९९ गावांचा धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या सहयोजनेत समावेश आहे.

आदिवासी क्षेत्र व समुदायाचा विस्तृत विकास करण्यासाठी मूळ पायाभूत सुविधा तसेच आर्थिक सबलीकरण होऊन सामाजिक प्रवाहात आणणे तसेच मत्स्य व्यवसाय वृद्धिंगत करणे हा योजनेचा मुख्य उद्देश असून जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबवा, अशी सूचना जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केली आहे.

# श्री ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय महिला शाखेतर्फे पुरस्कार वितरण

चिंचवड : भगवान महावीर जन्म कल्याण,बाबासाहेब आंबेडकर जन्म जयंती व या दोन महान विभूतीचे जन्म जयंतीचे औचित्य साधून समाजामध्ये उत्तम कार्य करणाऱ्या सारे जीवन समाजसेवेसाठी परिवारासाठी समर्पित करणाऱ्या महिलांना स्वानंद संस्थेच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त माता त्रिशला माई रमा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम बिजलीनगर येथील ब्रह्मचैतन्य हॉलमध्ये घेण्यात आला. यावेळी उपमहापौर शर्मिलाताई बाबर,नगरसेविका आशाताई सूर्यवंशी, जैन कॉन्फरन्स जैन भवनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक कुमार पगारिया, तसेच संस्थेच्या संस्थापिका व राष्ट्रीय महिला उपाध्यक्ष प्रा. सुरेखा कटारिया व स्वानंदच्या अध्यक्षा शोभा बंब यांच्या गरिमाभरी उपस्थितीमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले पुरस्काराचे मानकरी

सौ.ताराबाई मदनलाल बाकलीवाल, सौ लताजी अशोकजी पगारिया, केशरबाई हरकचंदजी भन्साळी यांना उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आली. यावेळी स्वानंदी जगण्याची कला या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये नकारात्मकता दूर ठेवून सकारात्मकतेने जीवन कसं जगावं यावर अतिशय सुंदर अशा प्रकारचं हे चर्चासत्र कीर्तनकार डॉक्टर श्वेता राठोड, शुभांगी कात्रेला यांनी रंगविले. महिलांनी आपल्या जीवनाचा पट अतिशय सुंदरतेन मांडला. उपस्थित असणाऱ्या महिलांना स्व कडे पाहण्यासाठी प्रवृत्त केले.या चर्चासत्रात उपमहापौर शर्मिलाताई बाबर, नगरसेविका आशाताई सूर्यवंशी प्रा सुरेखा कटारिया, शोभा बंब यांनीही सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शोभा बंब यांनी केले नवकार कंचनमाला बाफना, सुनिता कांकरिया यांच्या मंत्रमुग्ध आवाजाने नवकार महामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी कासारवाडी संघाचे अध्यक्ष विलासजी पगारिया दापोडी संघाचे अध्यक्ष दिलीपजी भन्साळी ,पिंपरी चिंचवड जैन महासंघाचे अध्यक्ष श्रेयासजी पगारिया, पारस भवनचे अध्यक्ष देवेंद्रजी बाकलीवाल, जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारणी सदस्य चंद्रकांतजी भन्साळी, पुणे जिल्हा विभागाचे जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष प्राध्यापक प्रकाश कटारिया, तपस्वी प्रवीण जी भन्साळी स्वानंदच्या माजी अध्यक्ष सुनिता देसर्डा ,राजश्री बिनायकिया , कंचनमाला बाफना,जैन सोशल ग्रुपच्या मंजू धोका तपस्वी मंगलताई भन्साळी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# सातारा जिल्ह्याला जागतिक पर्यटन हब बनविण्यासाठी कोयना-दौलत डोंगरी महोत्सवासारखे महोत्सव ही काळाची गरज-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सातारा : सातारा जिल्हा हा निसर्गरम्य आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. या जिल्ह्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नकाशावर मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, सातारा जिल्ह्याला 'पर्यटन हब' बनविण्यासाठी आणि स्थानिक भूमिपुत्रांना स्थानिक ठिकाणीच का मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

कोयना दौलत डोंगरी महोत्सवाचा सांगता समारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी कोयना नदीवरील सांगवड येथील मोठ्या पुलाचे, दौलत नगर येथील शिवदौलत स्टेडियम व महाराष्ट्र दौलत लोकनेते बाळासाहेब देसाई शताब्दी स्मारक येथील संगीत कारंजे व लेझर शोचे, तसेच स्व. शिवाजीराव देसाई स्मृतिभवनाचे उद्घाटन करण्यात आले.

याचबरोबर पाथर्डी येथील दूरदृश्यप्रणालीद्वारे जल पर्यटन केंद्राचेही उद्घाटनही करण्यात आले. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, प्रभारी पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील, व्यवस्थापक निलेश घटने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, लोकनेते बाळासाहेब सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई, आदी मान्यवर उपस्थित होते.उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पर्यटन विकासासाठी व महाबळेश्वरवरील पर्यटकांचा ताण कमी करण्यासाठी आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'नवीन महाबळेश्वर' विकसित केले जात आहे. यामुळे स्थानिकांच्या जमिनींना चांगला भाव मिळेल आणि पर्यटनाला मोठी चालना मिळेल. डिसेंबर-जानेवारीमध्ये कोयना बॅकवॉटर फेस्टिवलचे आयोजन केले जाणार आहे. हा महोत्सव जागतिक दर्जाचा करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

शहरांमध्ये नेहमीच मोठमोठे सांस्कृतिक महोत्सव होत असतात पण डोंगरी भागात राहणाऱ्या दुर्गम दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी शेतकरी बांधवांना कोयना दौलत डोंगरी महोत्सवासारख्या महोत्सवांमधून सांस्कृतिक मेजवानी दिली जात आहे. यामध्ये भजन कीर्तन, लावणी,पोवाडा,खाद्य जत्रा याबरोबरच पॅराग्लायडिंग, सी-प्लेन राईड आणि स्कुबा डायव्हिंग यांसारख्या साहसी खेळांना चालना दिली जात आहे. यातून अनेक कलाकारांना देखील व्यासपीठ मिळत आहे.

वासोटा आणि इतर महत्त्वाच्या पर्यटन स्थळांसाठी अर्थसंकल्पात रोपवे मंजूर करण्यात आला आहे. दर्जेदार पायाभूत



सुविधा आणि कनेक्टिव्हिटीसाठी पुलांची उभारणी केली जात आहे. यामध्ये कोयना नदीवर तापोळा आणि आपटी येथे मोठे पूल बांधले जात आहेत, ज्यामुळे दुर्गम भागातील १०५ गावे जोडली जातील आणि पश्चिम महाराष्ट्र व कोकण यांच्यातील संपर्क अधिक सुलभ होईल.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शेतकरी आणि युवकांसाठी योजना क्लस्टर शेती उपक्रम राबविला जात आहे. जेणेकरून कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येईल. बांबूला आता 'गवत' वर्गात समाविष्ट केल्याने त्याच्या लागवडीसाठी मनरेगातून अनुदान दिले जात आहे. सातारा जिल्ह्यात सुमारे ८,००० एकरवर बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. बोंडारवाडी धरणाच्या कामाला चालना देण्यात येईल, सातारा एमआयडीसी मध्ये चांगले उद्योग आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजनाही प्राधान्याने राबविली जाईल असेही ते यावेळी म्हणाले.

आपली बांधिलकी सर्वसामान्य लोकांशी आहे त्यातूनच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा जन्म झाला आहे असे सांगून श्री शिंदे यांनी ही योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, अशी ग्वाही दिली.ई-केवायसीसठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकरी सन्मान: 'नमो शेतकरी सन्मान योजने'द्वारे शेतकऱ्यांना वार्षिक १२,००० रुपये (केंद्र व राज्य सरकार मिळून) दिले जात आहेत.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी सातारकर म्हणून आपला अभिमान व्यक्त करताना सांगितले की, मी जरी उपमुख्यमंत्री असलो, तरी शेवटी सातारचा एक सामान्य शेतकरी पुत्र आणि कार्यकर्ता आहे. लोकांच्या कामासाठी आणि जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची कमतरता कधीही भासू देणार नाही. यावेळी या परिसरातील नागरिक, अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार यशराज देसाई यांनी मानले.

### विकासकामांचे उद्घाटन

**एकनाथ शिंदे यांनी त्यांनी पाटण तालुक्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला. त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतील विविध विकासकामांचे उद्घाटन आज झाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळेच तारळी धरणातील 'शंभर हेड'वरून शेतकऱ्यांना पाणी देणे शक्य झाले. तसेच मोरणा-गुरेघर धरणातील पाणीही नदीपात्रात सोडण्यात आले असून, याचा फायदा दोन्ही तीरांवरील शेतकऱ्यांना झाला आहे. यापुढील काळातही पाटण तालुक्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.**

### कलाकारांना व्यासपीठ

**पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले की, डोंगरी महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पुढील वर्षापासून या महोत्सवाचा कालावधी वाढवण्याची नागरिकांची मागणी आहे. या डोंगरी महोत्सवात कृषी प्रदर्शन, बचत गटांचा मेळावा, पोवाडे, भजन, ब्रास बँड यांसह विविध कार्यक्रमांच्या आयोजना बरोबरच दररोज संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कलाकारांनाही व्यासपीठ उपलब्ध करून दिले.**

# बारामती पोटनिवडणुकीत मतदारांसाठी 'ईसीआयनेट'ची सोय

## उमेदवारांची सविस्तर माहिती एका क्लिकवर

पुणे : बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना उमेदवारांविषयी सविस्तर व पारदर्शक माहिती सहज उपलब्ध करून देण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'ईसीआयनेट' या एकात्मिक डिजिटल व्यासपीठाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून मतदारांना उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता व दायित्वे, शैक्षणिक पात्रता तसेच अधिकृत सामाजिक माध्यमांवरील खात्यांची माहिती 'आपला उमेदवार जाणून घ्या' या घटकाद्वारे पाहता येणार आहे.

मतदारांना ईसीआयनेटमधील निवडणूक प्रक्रिया या विभागांतर्गत हा घटक सहज उपलब्ध असून, त्याद्वारे उमेदवारांनी सादर केलेले संपूर्ण प्रतिज्ञापत्र (फॉर्म २६) देखील उतरवता येणार आहे. यामुळे मतदारांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होणार आहे. ईसीआयनेट हे जगातील सर्वात मोठे निवडणूक सेवा व्यासपीठ असून, भारतातील निवडणूक प्रक्रियेशी संबंधित ४० हून अधिक ॲप्स व संकेतस्थळे एकत्रित करून एकसंध डिजिटल अनुभव देण्यात आला आहे. या व्यासपीठाद्वारे मतदार नोंदणी, मतदार यादी शोध, अर्जाची स्थिती पाहणे, निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद, ई-मतदार ओळखपत्र डाउनलोड, मतदानाचे प्रवाह तसेच तक्रार निवारण यांसारख्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत.

याशिवाय, ईसीआयनेटवर 'सी-सिव्हिजल' या ॲपद्वारे आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नोंदविता येतात, तर 'सक्षम' उपक्रमाद्वारे दिव्यांग मतदारांसाठी सुलभ सेवा पुरविण्यात येत आहेत. या सर्व सुविधा एकाच सुरक्षित व्यासपीठावर उपलब्ध असल्याने मतदारांना तत्काळ माहिती व तक्रार निवारणाची प्रभावी सोय मिळत आहे. बारामती पोटनिवडणुकीत पारदर्शक, सुजाण आणि सक्रिय मतदानासाठी मतदारांनी ईसीआयनेटचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

# समता आश्रमशाळेतील शिक्षक भरतीची जाहिरात रद्द; शासनाची परवानगी नसल्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे स्पष्टीकरण

सातारा : इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सातारा जिल्ह्यात अनुदानित तत्त्वावर स्वयंसेवी संस्थांमार्फत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा ३३ आश्रमशाळा कार्यरत आहेत. या आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन शासनामार्फत अदा केले जाते. त्यामुळे आश्रमशाळांच्या मान्यता व पदभरतीबाबतचे सर्व अधिकार शासनाकडे राखीव असून पदभरती करण्यापूर्वी शासनाची अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, मांगल्य शिक्षण प्रसारक संस्था, पुणे या संस्थेने समता प्राथमिक आश्रमशाळा पाडेगाव (ता. खंडाळा) येथे शिक्षक पदभरतीसंदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली आहे. मात्र ही जाहिरात शासनाची परवानगी न घेता प्रसिद्ध करण्यात आल्याने ती नियमबाह्य असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे.शासन निर्णय दि. ३ डिसेंबर २०२५ नुसार शिक्षक भरती Pavitra Portal (पवित्र पोर्टल) द्वारेच करणे अनिवार्य आहे. पवित्र प्रणालीव्दारे शिक्षण सेवक भरती न करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना संबंधित रिक्त पदाचे वेतन किंवा वेतनेतर अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, अशी तरतूद शासनाने केली आहे.

# समिती स्थापनेचा निर्णय ऊसतोड महिलांसाठी जनजागृती



पुणे : राज्यशासनाने गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात राज्यस्तरीय समिती पुर्नगठीत करण्यात आली आहे, या समितीचे कामकाज अधिक गतीने तसेच प्रभावीपणे होण्यासाठी लवकरात लवकर जिल्हास्तरीय समित्यांच्या कामाचे स्वरूप लवकरच ठरविण्याचा निर्णय विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी घेतला. ऊसतोड महिला कामगारांमध्ये आरोग्य विषयी व्यापक स्वरूपात जनजागृती करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात यावे, असेही निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

पुणे विधान भवन येथील झुंबर सभागृह येथे गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात स्थापित राज्य समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार डॉ. मनीषा कायंदे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) तर आमदार नमिता मुंदडा, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य सेवा अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांचे प्रमुख, समिती सदस्या डॉ. संगीता चव्हाण, युनिसेफचे आरोग्य तज्ज्ञ डॉ. मंगेश गढरी यांच्यासह तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, जिल्हस्तरीय समितीमार्फत मागील ३ वर्षातील राज्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत तपासणी करावी. खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत तपासणी करावी. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे या बाबतीत तपास करणे. अनावश्यक शस्त्रक्रियांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि या समितीच्या वर्षातून कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करावे .

शासन ऊसतोड महिला कामगाराचे जीवनमान अधिक सुखकर करण्याकरिता प्रयत्नशील आहे. आरोग्य विभागाच्यावतीने सुमारे एक लाख ऊसतोड महिला कामगारांना आरोग्य सेवा पोहचविण्याचे काम केले आहे. या कामगारासोबत राज्यातील १७ जिल्ह्यातून ऊसतोडीकरिता स्थालांरित होणाऱ्या कामगारासोबत सुमारे ५ हजार मुले सोबत असतात, या मुलांच्या आरोग्य, शिक्षणाकरिता करावयाच्या उपाययोजना, मासिक पाळीच्यावेळी वापरण्यात येणारी आयुधे, सॅनिटरी नॅपकिन मोफत पुरवठा, अधिकच्या आरोग्य पुरविण्यासोबत आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. येत्या काळात सहकार विभाग, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, ग्रामविकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि यासंबंधित काम करणारे घटकांसोबत घेवून बैठक आयोजित करण्यात येईल. त्यापूर्वी समाजातील आरोग्य व महिला क्षेत्रात काम करणारे घटक, सामाजिक संघटनांनी पुढे येवून आपल्या सूचना मांडाव्यात, असेही आवाहन डॉ.गोऱ्हे यांनी केले.

**बीड जिल्हा प्रशासनाचा मिशन साथी स्त्युत्य उपक्रम**

जिल्हा परिषद बीडमार्फत स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या विविध आरोग्य विषयक समस्यांकरिता प्रायोगिकतत्वावर मिशन साथी स्त्युत्य उपक्रम आहे. या उपक्रमाअंतर्गत आरोग्य विभागमार्फत आरोग्य साथी उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. ऊसतोड कामगारांची माहिती संकलित करण्यासोबतच त्यांच्या आरोग्य तपासणीसाठी जिल्हा, तालुका व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यात एकूण ७७० आरोग्य साथी असून त्यापैकी ४४६ चे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे, अशा प्रकारचे उपक्रम इतर जिल्ह्याने राबवावे, अशा सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केल्या.

आमदार श्रीमती मुदंडा यांनी ऊसतोड महिला कामगारांच्या मुलाच्या आरोग्य व शिक्षणाबाबत सूचना केल्या. कामगारांकरिता करण्यात आलेल्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी शासकीय पातळीवरुन होत आहे, कामगारांचे हीत लक्षात घेता साखर कारखाने आणि मुकादमांनी प्रयत्न करावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी समिती सदस्याने बैठकीच्या अनुषंगाने सूचना केल्या. या बैठकीत डॉ. कंदेवाड यांनी जिल्ह्यानिहाय साखर कारखान्याची संख्या, ऊसतोड पुरुष व महिला कामगाराची संख्या, हंगाम काळात स्थालंतरीत होणारे कामगार, आरोग्य कृतीदल स्थापन केल्या गावांची संख्या, ऊसतोड कामगार तपासणी शिबीर, मासिक पाळी गर्भनिरोधक साधनांचा वापर, आरोग्य पत्रिका, आभा कार्डचे वितरण, रक्तक्षय बाधित महिला कामगारांची संख्या, गर्भवती ऊसतोड् महिला कामगारांची संख्या, तपासणी केलेल्या गर्भवती महिलांची संख्या आदी बाबत माहिती दिली. तसेच बीडचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. यांनी बीड जिल्ह्याच्या अनुषंगाने माहिती दिली. बैठकीत महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यात अग्रक्रमाने काम करण्याची आवश्यकता समोर आली.

# सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्रैमासिक विवरणपत्र तात्काळ सादर करावे-सहाय्यक आयुक्त इनुजा शेख

सांगली : जिल्ह्यातील सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी ३१ मार्च २०२६ अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र (ई.आर-१) तात्काळ सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त इनुजा शेख यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करण्यास भाग पाडणे) अधिनियम १९५९ नुसार रिक्तपदे कळविण्याबाबत व तिमाही विवरणपत्र ईआर-१ मध्ये मनुष्यबळाची माहिती सादर करणे बंधनकारक आहे. सांगली जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील उद्योजकांनी त्यांच्याकडे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या माहितीबाबतचे दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या तिमाहीचे विवरणपत्र ईआर-१ https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवरून ऑनलाईन सादर करावे. अधिक माहितीसाठी ०२३३-२९९०३८३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

# पुस्तकोपहार-२०२६ : ज्ञानदानातून वृक्षसंवर्धनाचा संदेश - केन्द्रीय विद्यालय नांदेडची अभिनव पहल

नांदेड : पी.एम.श्री.केन्द्रीय विद्यालय द.म.रे. नांदेड येथे पुस्तकोपहार-२०२६ या अभिनव उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ता.२७ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमाने केवळ ज्ञानदानाचाच नाही तर पर्यावरण संवर्धनाचाही प्रभावी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपली वापरून झालेली पाठ्यपुस्तके,संदर्भ पुस्तके आणि इतर उपयुक्त पुस्तके गरजू विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्याचे आव्हान करण्यात आले. ज्ञान हेच सर्वात सुंदर उपहार हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.विद्यालयात इयत्ता १ ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या जुन्या पण चांगल्या स्थितीत असलेल्या पुस्तकांचे संकलन करून शिक्षकांकडे जमा केले.ही पुस्तके पुढे गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले आहेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ पुस्तकदान नसून वृक्ष संवर्धनालाही चालना देणे हा आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (णछएझ) च्या अहवालानुसार एक टन कागद तयार करण्यासाठी सुमारे २४ झाडे तोडावी लागतात त्यामुळे वापरलेल्या पुस्तकांचा पुनर्वापर केल्यास मोठ्या प्रमाणावर झाडांची बचत होऊ शकते.मागील वर्षी विद्यार्थ्यांनी हजारो पुस्तके दान करून शेकडो झाडे वाचवण्यास हातभार लावला होता तसे यावर्षीही या उपक्रमातून पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे. विद्यालयाचे प्राचार्य श्री.अशोक विश्वकर्मा यांनी सांगितले की, पुस्तकोपहार हा केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये दानशीलता, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव निर्माण करणारी एक सुंदर परंपरा आहे.प्रत्येक विद्यार्थ्याने या उपक्रमात सहभागी व्हावे.

# गोपूज येथे 'ज्याचा त्याचा विठ्ठल' नाटकाचा शनिवारी रंगतदार प्रयोग

औंध : गोपूज येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानिमित्त गोपुज येथे रुपक निर्मित 'ज्याचा त्याचा विठ्ठल' या नाटकाचा रंगतदार प्रयोग आयोजित करण्यात आला आहे. शनिवार दि. ११रोजी रात्री ९.०० वाजता श्री भैरवनाथ मंदिर प्रांगणात हा कार्यक्रम पार पडणार असून परिसरातील नागरिकांसाठी ही एक मोठी सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे.


या नाटकाचे लेखन डॉ. समीर कुलकर्णी यांनी केले असून दिग्दर्शक अमित वझे यांचे आहे. संगीताची धुरा जयदीप वैद्य व निनाद सोलापूरकर यांनी सांभाळली आहे, तर चित्ररचना मिलिंद मुळीक यांनी केली आहे. प्रकाश योजना सुजय भडकमकर यांची आहे.

नाटकात गजानन परांजपे, अमित वझे , पार्थ उमराणी, निनाद सोलापूरकर, अबोली देशपांडे, प्रसाद कुलकर्णी, ओंकार जोशी, पार्थ गरुड आणि मधुराणी गोखले यांसारखे कलाकार आपल्या अभिनयाची छाप पाडणार आहेत. सुमारे २ तास ४५ मिनिटे कालावधी असलेल्या या नाटकासाठी प्रेक्षकांची वयोमर्यादा १२ वर्षे व त्यावरील आहे. आयोजकांच्या वतीने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी सैनिकांसाठी सांगलीत ८ एप्रिलला शिबीर

सांगली : माजी सैनिकांना त्यांच्या आवडीनुसार योग्य तो कौशल्य विकास अभ्यासक्रम निवडता यावा आणि त्यांचे प्रभावी पुनवर्सन व्हावे यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली यांच्यातर्फे, सैनिक संकुल, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सांगली येथे दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ दरम्यान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल. डॉ. भिमसेन चवदार (निवृत्त) यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे. अधिक माहितीसाठी ०२३३-२९९०७१२ या दुरध्वनीवर संपर्क साधावा, असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# 'सोशल मीडिया' वरील संशोधनासाठी माहिती संचालक किशोर गांगुर्डे यांना पीएच.डी.



मुंबई : राज्याचे माहिती आणि जनसंपर्क संचालक किशोर गांगुर्डे यांना जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने 'वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन' विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे. कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते श्री. गांगुर्डे यांना पीएच. डी. पदवीची अधिसूचना देऊन सन्मानित करण्यात आले. 'महाराष्ट्र शासनाच्या माहिती प्रसारणासाठी समाजमाध्यमांचा वापर आणि प्रभाव : एक अभ्यास' या विषयावर श्री. गांगुर्डे यांनी संशोधन करुन शोधप्रबंध सादर केला होता. शासनाचे निर्णय, लोकाभिमुख योजना, धोरणे आणि माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात समाजमाध्यमांची भूमिका किती प्रभावी ठरते, याचे सखोल विश्लेषण त्यांनी या संशोधनात केले आहे. या संशोधनासाठी त्यांना विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळेचे माजी संचालक प्रा. डॉ. सुधीर भटकर यांचे मार्गदर्शन लाभले. राज्य शासनाच्या सेवेतील जनसंपर्क व प्रसिद्धीविषयक कामाचा दोन दशकांपेक्षा अधिक कालावधीचा अनुभव तसेच माहिती व जनसंपर्क विभागात सोशल मीडिया शाखेची त्यांनी केलेली सुरुवात यामुळे श्री. गांगुर्डे यांचे हे संशोधन महत्त्वाचे मानले जाते. शासकीय माहिती प्रसारासाठी शासनात सोशल मीडियाची सुरुवात करून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल २०१८ मध्ये नागरी सेवा दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गांगुर्डे यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## विश्वासराव नाईक महाविद्यालयात तृतीय वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात



शिराळा : विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालयांमध्ये दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी २०२५-२६ मधील तृतीय वर्षातील आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा सदिच्छा (निरोप) समारंभ आयोजित केला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परमपूज्य स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्थेचे सचिव विश्वप्रतापसिंग नाईक (दादा) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच भविष्यामध्ये काही अडचण आली किंवा कोणतीही मदत लागली तरी आमच्या संस्थेची दारे कायम आपल्यासाठी उघडी असतील असे आश्वासन देखील दिले. कु. किरण साळुंखे BSC III, कु. वैष्णवी जाधव B-III, कु. वैष्णवी शिंदे BCOM III या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच उपप्राचार्य प्रा भीमराव दशवंत, प्रा संदीप देशमुख यांनी प्राध्यापक मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये प्राचार्य डॉ आर बी बनसोडे, उपप्राचार्य प्रा राजसिंह पाटील,उपप्राचार्य प्रा भीमराव दशवंत, इतिहास विभाग प्रमुख डॉ तानाजी हवालदार, मराठी विभाग प्रमुख डॉ प्रकाश हुलेनवार, हिंदी विभाग प्रमुख डॉ मिलिंद साळवे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ गंगाधर भुक्तर, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप देशमुख, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप गारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ उज्वला बिरजे इतर प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु अमृता शिंगटे BCOM III, प्रास्ताविक कु श्रेया नलवडे BSC III आणि आभार प्रदर्शन कु हर्षदा शेणवी BSC III यांनी केले.

# प्रेरणादायी भेट आणि मार्गदर्शनाचा सुवर्ण क्षण

## कराड महामार्ग पोलीस उपनिरीक्षक सुरेश पाटील



शिराळा : शिराळा येथील श्रीराम अभ्यासिका येथे कराड महामार्ग पोलीस उपनिरीक्षक सुरेश पाटील साहेब व शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष रामचंद्र देशमुख पाटील साहेब यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी श्रीराम उर्फ बंटी नागरे यांनी चालू केलेल्या अभ्यासिकेच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी सुरेश पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, मेहनत, शिस्त आणि चिकाटी हेच यशाचं खरं गमक आहे. कोणतेही ध्येय गाठण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. त्यांच्या या प्रेरणादायी संदेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. तसेच रामचंद्र देशमुख पाटील साहेब यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. अशा मान्यवरांच्या भेटीमुळे श्रीराम अभ्यासिकेला नवी ऊर्जा व दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमास अभ्यासिकेतील विद्यार्थी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# साताऱ्यात शासकीय निवासस्थानी महावीर जयंतीलाच संगीत नि रंगीत आखाडी साजरी

**(अजित जगताप)**

सातारा : कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या निर्मितीने खऱ्या अर्थाने जलसिंचन गतीने झाले. साताऱ्यातील कृष्णानगर



येथील अधीक्षक अभियंत्यांच्या शासकीय निवासस्थानी अहिंसा पुजारी महावीर जयंती दिनी संगीत नि रंगीत उघडपणे कार्यक्रम झाला. खऱ्या अर्थाने आखाडी साजरी झाल्याची चर्चा सुरू झालेली आहे. मटणाचा आस्वाद घेणाऱ्यांनी मात्र याबाबत मौन पाळणे महत्त्वाचे मानले आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीमुळे खऱ्या अर्थाने साताऱ्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, पर्यटन मंत्री आणि ग्राम विकास मंत्री असे चार मंत्रिपद असणाऱ्या सातारा जिल्ह्यात प्रशासकीय कारभार गतिमान आहे. तो एवढा गतिमान आहे की, शासकीय निवासस्थानी अहिंसा पुजारी महावीर जयंती दिनी दारूचा महापूर व मटणाचा ढीग अशी आखाडी साजरी झाली. शाकाहारी व मांसाहारी जेवणाचा आस्वाद घेऊन अनेकांनी तृप्तीचे ढेकर दिले. जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री जयंत शिंदे साहेब यांच्या शासकीय निवासस्थानी अगदी मंडप व रोषणाई करून हा अद्वितीय सोहळा पार पडला.

विशेष बाब म्हणजे गाव जेवण असल्यासारखे अनेक जण उपस्थित होते. अवकाळी पावसाने गारठलेल्यांना घोटभर उब देण्याचा प्रकार या ठिकाणी राजेरोसपणाने साजरा झाला झाला. मार्च एंडिंग च्या निमित्ताने एप्रिल फुल नंतर दोन तारखेला महावीर जयंती मुहूर्तावर किती जणांचे बळी गेले? हे सांगणे आता कठीण झाले आहे. होय मी रंगीत नि संगीत ऐकण्यासोबत जेवण घातले? असे सांगण्याचे धाडस आता कोण करणार? हा सुद्धा कळीचा मुद्दा बनला आहे.

जलसंपदा विभागाने अनेक योजना सातारा जिल्ह्यात राबवल्या असल्या तरी प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्याच्या शेतापर्यंत काही पाटबंधारे व धरणाचे पाणी पोहोचले नाही. ही वस्तुस्थिती आहे. असे असताना दारूचा पूर आणि मटणाचा ढीग नेमका कशासाठी ? आणि त्याचा दरवळणारा वास काहीच्या नाकापर्यंत का पोहोचला नाही? हा सुद्धा प्रश्न आहे.

सातारा जिल्ह्यात कृष्णा खोरे विकास महामंडळ खऱ्या अर्थाने १९९५ साली युतीच्या माध्यमातून स्थापन झाले. आता तर भाजपची एकतर्फी सत्ता असल्यामुळे हम करे सो कायदा असा आता वायदा देणारे सत्तेवर आले आहेत. राज्यात शिंदे शाही व साताऱ्यातही शिंदेशाही आणि पाटबंधारे विभागातच ही शिंदेशाही अवतरली आहे. आध्यात्मिकेचे झुल पांघरुण नंगानाच सुरू आहे. पोट पूजा करण्यासाठी दुर्गा पूजेचे नाव सांगण्यात येत आहे.

अनेक ठेकेदारांचे टक्केवारी या कामी धावून आली आहे. नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या सत्ताधारी व विरोधी पक्षांनी याबाबत आवाज उठवला नाही तरी चालेल कारण, आता सत्ताधारी व विरोधक ही मध्यरेषा पुसट झाली आहे. तरी जनता मात्र या मटणावळी व टक्केवारीचा धूर फार काळ सहन करणार नाही. अशी माहिती काहीही दिली आहे.



# सामान्य कार्यकर्त्याचा सन्मान ठेवणारा भाजप पक्ष-आ.गोपीचंद पडळकर



शिराळा(प्रतिनिधी):सामान्य कार्यकर्त्याचा सन्मान ठेवणारा भाजप पक्ष आहे. या पक्षात काम करणाऱ्या माणसाला संधी मिळते पक्षाची भूमिका घेऊन काम करा असे आवाहन आमदार गोपीचंद पडळकर यांनी मणदूर ता.शिराळा येथे केले.

मणदूर येथे भारतीय जनता पार्टी शिराळा ग्रामीण व शहर यांच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या अभियानाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. सुरुवातीला दीप प्रज्वलन व फोटो पूजन आमदार सत्यजित देशमुख, माजी आमदार भगवानराव साळुंखे, भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या हस्ते संपन्न झाले. ज्यावेळी बोलताना आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले- भाजप हा पक्ष काम करणाऱ्या माणसाचा संधी देत असतो, त्यामुळे सतत काम करत रहा. भाजपच्या माध्यमातून अनेक लोकांना चांगली संधी मिळालेले केंद्र व राज्य सरकारने शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत व शाश्वत विकास करण्याचे धोरण आखले असून अनेक मोठ्या प्रमाणा मध्ये प्रकल्प व योजना उभारल्या जात आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती केंद्रबिंदू मानून काम केले जात आहे. राजकारणात काम करत असताना विरोध हा होतच असतो पण त्याला जुगारून काम करा. आमदार सत्यजित देशमुख यांचे विधिमंडळातील काम व मतदारसंघांमध्ये कमी कालावधी मध्ये केलेली कामे निश्चितपणे लक्षवेधी असून नागपंचमी सारखा महत्त्वपूर्ण विषय त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून हातामध्ये घेत सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी माजी आमदार भगवानराव साळुंखे यांनी भाजप पक्षाचा इतिहास व पक्षाच्या माध्यमातून झालेली कामे याची माहिती दिली. पक्षाच्या कार्यपद्धतीबाबत सखोल मार्गदर्शन जिल्हा बँकेचे संचालक चिमण डांगे यांनी केले. निवडणुकीच्या दृष्टीने मतदार यादीची पुनर्रचना हे काम एक मोहीम म्हणून हाती घेण्यात यावे अशी आव्हान भाजपा नेते शरद लाड यांनी केले. माहिती व जनसंपर्क च्या बाबतीत विजय वरुडकर यांनी सर्वांना माहिती दिली. वैचारिक अधिष्ठान या विषयावरती योगेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य साईतेजस्वी देशमुख, माजी सभापती हणमंतराव पाटील, सुखदेव पाटील, के.डी.पाटील,भाजपा जिल्हा महिला अध्यक्षा अनिताताई धस, उपनगराध्यक्ष बसवेश्वर शेटे नगरसेवक केदार नलवडे, भाजपा गटनेत्या नगरसेवक प्राजक्ता कुलकर्णी,नगरसेवक रमेश कांबळे, नगरसेवक सचिन डांगे, नगरसेवक अभिजीत यादव, महेश पाटील, संगीताताई साळुंखे, विद्याताई पाटील, रूपाली भोसले, मंगल साळुंखे, त्यांच्यासह प्रमुख मान्यवर कार्यकर्ते पदाधिकारी बुथ प्रमुख, उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक सत्यजित पाटील यांनी केले. आभार कुलदीप निकम यांनी मांडले.

# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा

## सैनिक स्कूल परीक्षेत उज्ज्वल यश

करा़ड : कोळे (ता. कराड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोळे मुले या शाळेने यंदाच्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा व सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

नवोदय परीक्षेत कु. तनिष्का संतोष पाटील हिने ९८.७५% गुण मिळवत विशेष प्राविण्य प्राप्त केले असून तिची सातारा जिल्ह्यातील नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. तसेच सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत कु. आरोही अरुण ताडे व चि. वीर विजय ताडे यांनी यश मिळवत निवड निश्चित केली आहे. इतर यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये चि. समर्थ सचिन पाटील (९०%), चि. वीर विजय ताडे (९३.७५%), कु. आरोही अरुण ताडे (९२.५०%), कु. ऋतिका संतोष कराळे (८२.५०%), कु. संस्कृती दत्तात्रय माळी (८२.५०%) व कु. श्रेया विजय



शिंगण (६८.७५%) यांचा समावेश आहे. या यशामागे वर्ग शिक्षिका सौ. कांचन काळे पाटील, श्रीमती मनीषा रणसिंग, मुख्याध्यापिका सौ. छाया शिंदे तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती व पालकांचे सहकार्यही मोलाचे ठरले.

या यशाबद्दल कराड पंचायत समितीचे सदस्य अर्जुन कराळे, गटशिक्षणाधिकारी मा. बिपीन मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी मा. श्रीमती जमिला मुलाणी, केंद्रप्रमुख आनंदा धायगुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संभाजी चव्हाण तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त विठामाता विद्यालयात फलक लेखन उपक्रम

कराड : जागतिक आरोग्य दिनानिमित्त विठामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कराड येथे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याच अनुषंगाने इयत्ता ७ वी 'ब' मधील विद्यार्थिनी महेविश तांबोळी हिने आकर्षक व संदेशपर फलक लेखन करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

महेविश हिने आरोग्यविषयक संदेश प्रभावी शब्दांत आणि सुबक अक्षरांमध्ये मांडत स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायामाचे महत्त्व अधोरेखित केले. तिच्या या उपक्रमामुळे इतर विद्यार्थ्यांनाही आरोग्याबाबत जागरूक होण्याची प्रेरणा मिळाली.



या उपक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. सौ. विश्रांती देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कला शिक्षक साळी जे. एन. यांनीही विद्यार्थिनीला आवश्यक ते मार्गदर्शन करून उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी कौतुक केले असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान व सर्जनशीलता विकसित होण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# मंदिरातील उत्सव यात्रेतील चंगळवादाला आळा घालावा : नवल शेवाळे

## गुरव विकास प्रतिष्ठानचा पुजारी वर्गाला जाहीर पाठिंबा

कराड : ज्योतिबा मंदिराच्या अलीकडील उत्सव काळात काही तरुणांकडून घडलेल्या गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर धार्मिक स्थळांवरील चंगळवादाला शासनाने तात्काळ आळा घालावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य गुरव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवल शेवाळे यांनी केली आहे. तसेच या प्रकरणात पुजारी वर्गाला प्रतिष्ठानचा व गुरव समाजाचा ठाम पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



नुकत्याच पार पडलेल्या ज्योतिबा उत्सवादरम्यान काही तरुणांनी धुडगूस घालत भाविक व पुजाऱ्यांची टिंगलटवाळी केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या सेवेकरी व पुजाऱ्यांकडून संबंधितांना चोप देण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यानंतर काही घटकांनी या घटनेचे राजकीय भांडवल करत माध्यमांद्वारे पुजारी वर्ग व मंदिर व्यवस्थापनाची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.या पार्श्वभूमीवर नवल शेवाळे यांनी मंदिर संस्कृती जपणाऱ्या पुजारी वर्गाची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दर्शविला. यावेळी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रविंद्र गुरव, ठाणे शहर अध्यक्ष दिवाकर गुरव, ज्योतिबा डोंगर वाडी रत्नागिरी येथील मानकरी ग्रामस्थ तसेच गुरव पुजारी समाजाचे अध्यक्ष सुनील सांगळे, अमर नवळे, महादेव झुगर, अंकुश दादणे, रमेश ठाकरे, विजय बुने, आदिनाथ लादे, मधुकर शिंगे, प्रवीण भंडारे, सोमनाथ शिंगे, जयवंत शिंगे, रणजित चौगुले, मारुती सतरंडेकर, गोरख बुने, पोपट फुकटे, निखिल चिखलकर, तुषार झुगर आदी उपस्थित होते.

दरम्यान, देवस्थान परिसरात घडलेल्या या प्रकाराचा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने निष्पक्षपणे तपास करून दोषींवर कारवाई करावी व पुजारी वर्गाला न्याय द्यावा, अशी मागणी गुरव समाज संघटनांनी केली आहे. अन्यथा राज्यभरातील गुरव समाजाला घंटा व शंखनाद करत मंदिरात उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागू शकतो, असा इशाराही देण्यात आला. शेकडो वर्षांपासून पुजारी वर्गाने मंदिर संस्कृतीचे जतन करत धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जोपासल्या आहेत. अशा प्रकारची घटना यापूर्वी कधी घडली नसल्याचे मत ज्योतिषतज्ज्ञ प्रवीण राजगुरू, सामाजिक कार्यकर्ते कैलासआबा शेलार व सदानंद बारभाई यांनी व्यक्त केले.

# शिराळा शहरातील ऐतिहासिक परंपरेची ओळख असलेल्या नागकट्ट्याची मोडतोड

## शिराळा : नाग कट्टा पूर्ववत करावा अन्यथा तीव्र आंदोलन

शिराळ्यात नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया. असा इशारा आणि लेखी निवेदन स्थानिक नागरिक व भाविकांनी,नाग मंडळांच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे. नागपंचमी उत्सवाशी निगडित असलेला हा नागकट्टा केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक वारशाचाही महत्त्वाचा भाग असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले. नागपंचमीला जगभरात विशेष महत्त्व असून, या सणामुळे शहराची ओळख अधिक ठळकपणे समोर येते. त्यामुळे अशा ऐतिहासिक स्थळांचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. नागकट्ट्याच्या संभाव्य मोडतोडीमुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, यावर तातडीने निर्णय घेऊन संरक्षणात्मक पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.



दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन नागकट्ट्याचे संरक्षण करावे, अन्यथा लोकशक्तीच्या माध्यमातून आंदोलन उभारले जाईल, असा ठाम इशारा नागरिकांनी दिला आहे.शिराळा नगरपंचायत मार्फत सध्या विकासाच्या नावाखाली शिराळा शहरातील उरली सूरली असणारी जागा नवीन रस्ता करून बेकायदा झाडे तोडून बेकायदा मुरूम उत्खनन करून, निर्ले खन न करता लोक भावनांचा न विचार करता करण्याचे काम सुरू आहे.विकास कामास आमचा अडथळा नसून ती विकासकामे लोक भावना जपून व लोकहिताची असावीत.अशी नागरिकांची मागणी आहे.यावेळी तहसीलदार शिराळा,नगरपंचायत अभियंता,यांना निवेदन देण्यात आले तसेच तहसीलदार व वनविभाग यांना येथील वृक्ष तोड आणि नाग कट्टा मुरूम उत्खनन यांची माहिती आणि निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदनावर ऍडव्होकेट सम्राट शिंदे, एडवोकेट अक्षय कदम, नगरसेविका सीमा कदम, अभिजीत यादव,बजरंग कदम, शिवाजी शिंदे,प्रमोद पवार, संजय कदम,अविनाश खोत,वैभव कुंभार,राजेंद्र कदम,बंटी नांगरे, नागेश कुंभार,संजय यादव, फिरोज मुजावर,सचिन कोतवाल, पोपट कोतवाल,राजेंद्र कानकात्रे, दिनकर कोतवाल, नगरसेवक, विविध नागमंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.या घटनेमुळे शिराळ्यात नागप्रेमी,नागमंडळांचे कार्यकर्ते,नागरिक यांच्यात अस्वस्थता आहे.शिराळ्यात ठिकठिकाणी बैठकांचे सत्र सुरू असून पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जात आहे.